# Greenlawns School - Worli

Terminal Examination - 2016

कक्षा :- सहावी

पूर्णांक :- 80

विषय :- मराठी

दिनांक :- 28.09.2016

समय :- 2 घण्टे

---

सूचना :- 1. सभी प्रश्न अनिवार्य हैं ।

2. शुद्ध भाषा एवं सुवाच्य लेखन अपेक्षित हैं ।

---

विभाग - अ

भाषा - विभाग (Marks - 40)

प्रश्न 1) खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा :- (08)

i. माझी आई

ii. गणेशोत्सव

iii. मला पंख मिळाले, तर ..... !

प्रश्न 2) खालील मुद्दयांच्या आधारे गोष्ट तयार करुन योग्य शीर्षक द्या :- (5)

एक व्यापारी ..... खूप पैसे घेऊंन गावी निघतो ..... वाटेत चोर ..... दोघेही रात्री धर्मशाळेत ..... चोर रात्री व्यापाऱ्याच्या पिशव्या तपासतो .... काहीही मिळत नाही ..... व्यापाऱ्याची युक्ती ..... व्यापारी चोराच्या उशीखाली पैसे ठेवतो ..... चोर चकित -

प्रश्न 3) खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :- (10)

एक होता उंदीर. राजवाड्यात तो फिरत होता. राजाने त्याला पाहिले व नोकरांना बोलावून सांगितले, " याला धरा व मारा ! " उंदराला आला राग. राजाची ऐट जिरवण्याचा त्याने निश्चय केला. एके दिवशी उंदीर बागेत फिरत होता. त्याला एक फडके सापडले. तो धावत शिंप्याकडे गेला व म्हणाला, " शिंपीदादा, शिंपीदादा, हे फडके घ्या व एक झक्कास टोपी शिवून द्या बघू. राजा आहे दुष्ट, त्याला देतो मी कष्ट ! " शिंपीदादाने त्याला टोपी शिवून

---

दिली. त्याला रंगीबेरंगी गोंडे लावले. उंदराने टोपी घातली. हातात डमरू घेतले व राजवाड्यात राजासमोर गाऊ लागला, " ढुम , ढुम , तुडू , ढुम ! ढुम , ढुम , तुडू , ढुम ! माझी टोपी किती छान , राजाची टोपी भिकार , " राजाला आला राग , त्याने उंदराची टोपी काढून घेतली. त्याचबरोबर उंदीर गाऊ लागला , " ढुम , ढुम , तुडू , ढुम ! राजा भिकारी , माझी टोपी घेतली , राजा चिडला. त्याने उंदराची टोपी त्याच्याकडे फेकून दिली. उंदीर परत डमरू वाजवून गाऊ लागला , " राजा घाबरला , माझी टोपी दिली , ढुम , ढुम , तुडू , ढुम ! ढुम , ढुम , तुडू , ढुम ! डमरू वाजवत उंदीर निघून गेला.

प्रश्न :-

| | | |
|---|---|---|
| i. | उंदराने कोणता निश्चय केला व का ? | (2) |
| ii. | उंदारांने शिंपीदादाला काय सांगितले ? त्याच्यानंतर शिंपीदादाने काय केले ? | (2) |
| iii. | राजाने उंदराची टोपी का काढून घेतली ? | (2) |
| iv. | राजाने उंदराची टोपी का फेकून दिली ? त्याने टोपी फेकल्यावर उंदीर राजाला कसा चिडवू लागला ? | (2) |
| v. | वाक्य बनवा :- दुष्ट , कष्ट | (2) |

## व्याकरण - विभाग

प्रश्न 4) प) समानार्थी शब्द लिहा :- (2)

1. वारा 2. तोंड
3. शेत 4. गाव

ब) विरुद्धार्थी शब्द लिहा :- (2)

1. थंडगार 2. शूर
3. जबाबदार 4. बोलका

क) लिंग बदला :- (2)

1. मित्र 2. दोरा
3. बाबा 4. पुरुष

ड) वचन बदला :- (2)

1. हाक 2. छत्री

3. किनारा 4. बाई

ज) खालील शब्द शुद्ध करून लिहा :- (2)

1. परिक्षा 2. अध्यात्मिक

3. अश्या 4. प्रतिक्षा

प्रश्न 4) अ) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :- (2)

1. केलेले उपकार विसरणारा
2. खूप आयुष्य असणारा
3. ऐकायला व बोलायला येत नाही असा
4. खूप पाऊस पडणे

प्रश्न 4) आ) खालील वाक्यातील सर्वनामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. मी जे सांगेन तेच कर.
2. त्याने घर झाडून घेतले.

प्रश्न 4) इ) खालील वाक्यातील विशेषणे ओळखून त्यांचे प्रकार लिहा :- (2)

1. रझिया धाडसी मुलगी आहे.
2. वयाच्या आठव्या वर्षी ती पोहायला शिकली.

प्रश्न 4) ई) वाक्प्रचारांचे अर्थ लिहा :- (1)

1. शाबूत राहणे
2. सर येणे

विभाग - ब

साहित्य - विभाग (40 Marks)

प्रश्न 5) अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :- (12)

i. मुलांना गहिवरून का आले ?

ii. सुगरण पक्ष्याला कसबी विणकर का म्हटले आहे ?

iii. नदीच्या काठावरचे लोक कुंदाला कोणत्या सूचना देत होते ?

iv. कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले ?

प्रश्न 5) आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (5)

i. कुंदा केव्हा पोहायला शिकली होती ?

ii. सुगरण पक्षी घरटे कुठे बांधतो ?

iii. रिमाने आनंदाने उड्या का मारल्या ?

iv. सुगरण पक्षी घरटे कशापासून बनवितो ?

v. झाडे , शेते हिरवीगार कशामुळे झाली होती ?

प्रश्न 5) इ) 'कां ते' लिहा :- (2)

i. मुलाने बाळाला मांडीवर घेतले.

ii. मुलाचे मन आनंदाने थुईथुई नाचू लागले.

प्रश्न 5) ई) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (3)

i. खेळता खेळता लहानगी .................. व .................. नदीकडे केव्हा गेल्या , ते कळलेच नाही.

ii. शाळेच्या परिसरात असलेल्या .................. .................. सुगरण पक्षी घरटे बांधत होता.

iii. स्टेशनवर .................. घेऊन .................. आला होता.

प्रश्न 5) उ) खालील दिलेली वाक्ये 'कोण कोणास म्हणाले' ते लिहा :- (3)

i. " सुगरण पक्ष्याने किती छान घरटे बांधले आहे."

ii. " पाण्याचा वेग वाढतो आहे . माघारी फिर."

iii. " उद्या आपल्याला आगगाडीने मामाच्या गावाला जायचे आहे."

प्रश्न 5) ऊ) नावे लिहा :- (2)

1. पट्टीची जलतरणपटू

2. बुडणारी मुलगी

3. सुगरण पक्ष्याचा महत्त्वाचा गुण

4. मुलाच्या बहिणीचे नाव

प्रश्न 5) क) शब्दार्थ लिहा :- (3)

| | |
|---|---|
| 1. लुकलुकणे | 2. सुबक |
| 3. कसब | 4. कवटाळणे |
| 5. सुखरुप | 6. माघारी |

कविता - विभाग

प्रश्न 6)

1. कवीला कोण - कोणत्या गोष्टी प्रिय आहेत ? (3)

2. भारतमाता या कवितेच्या कवीचे नाव लिहा ? (1)

प्रश्न 7) क) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा :- (4)

हिरवी ......................................

..................................................

..................................................

................................ वाचवा

ख) जोड्या जुळवा :- (2)

| " अ " | " ब " |
|---|---|
| 1. जमीन | अ. हिरवे |
| 2. ढग | आ. सुपीक |
| 3. शेते | इ. शांत |
| 4. वृक्ष | ई. उपकारी |

---------------- स मा प्त ----------------